सोलापूर महानगरपालिका

प्रेस नोट

सोलापूर दि १३/१०/१६-- सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने तुळजापुरला चालत जाण्याऱ्या भाविकांना आरोग्य सेवा रुपाभवानी चौकात एक स्वतंत्र असा मोठा स्टॉल टाकुन देणेचा शुभारंभ तुळजापूरला चालत जाण्यारे कर्नाटक इंडी गावाहुन चालत आलेले महादेवी व्हनसुरे व संगीता व्हनसुरे यांचे हस्ते फित कापुन व तुळजाभवानीचे प्रतिमेस पुष्पहार घालुन करणेत आला. यावेळी तुळजापूरला चालत जाणारे भाविकांनी सदर रुग्णसेवेचा लाभ तातडीने घेतला यावेळी बोलताना आयुक्त वि ना काळम म्हणाले की, सोलापूर महानगरपालिकेन यावर्षी प्रथमच अश्या प्रकारे सेंवा देणेचा शुंभारंभ केला आहे भाविकांना चालत जाताना साधरणत: चक्कर येणे , पाय दुखणे, पायाला जखम होणे , थकवा येणे अश्या प्रकारच्या तक्रारी असु शकतात त्याप्रमाणे येथे या ठिकाणी पेन किलर, शक्ती वर्धक पावडर, चिकटपटटी , तसेच कोणताही भक्त आरोग्यसेवेचा लाभ मिळण्यापासुन वंचीत रहाणार नाही याची दक्षता घेणेबाबत आरोग्य अधिकारी डॉ जयंती आडके यांना आदेश दिले आहेत .

याठिकाणी तातडीने एखादया रुग्णास सलाईन लावणेची गरज असेल तर तशी सोय याठिकाणी करणेत आली आहे . तसेच या ठिकाणी सतत २४ सेवा उपलब्ध असणार आहे व प्रत्येक पाळीत दोन डॉक्टर व त्यांनी सहायासाठी फारमासीस्ट , ड्रेसर ,दोन ॲम्बुलन्स सेवेत असणार आहे तातडीची मदत तसेच एखादया भाविकास ॲडमीट करणेची गरज भासलेस ५बेड डफरीन हॉस्पीटल येथे राखुन ठेवणेत आले आहेत तसेच याही पुढे ट्रिटमेंटेची आवश्यकता भासलेस तातडीने शासकीय रुग्णालय व अन्य हॉस्पीटल येथे पाठविणेची व्यवस्था करणेत आली आहे. सोलापूर महानगरपालिकेने ही सेव यावर्षी प्रथमच उपलब्ध करुन दिली आहे. आणी सोलापूरात एकाही भाविकास त्रास होऊ नये याची काळजी महानगरपालिका घेणार आहे.

ही कल्पना रुपाभवानी मंदीरात ज्यावेळी मी आलो त्यावेळी सुचली आणी नगर सेवक सुरेश पाटील , आनंद चंदनशिवे तसेच यावेळी उपस्थित असलेल देवस्थानचे ट्रस्टी यांनी ही सोलापूर महानगरपालिकेने भाविकांसाठी सालापूर महानगरपालिकेच्या वतीने आरोग्य सेवा उपलब्ध करुन देणबाबत सुचीत केले होते.

सोलापूर महानगरपालिका जर एखादया भाविकास अन्य ठिकाणी तो असेल आणी त्यास त्रास होत असेल तर महानगरपालिकेने आपत्कालीन कक्ष स्थापलेला आहे त्यांनी ०२१७ २७४०३३५ या दुरध्वनीवर कॉल केलेस तातडीने या भावीकास वैदयकीय सहाय मिळेण्याची व्यवस्था करणेत आली आहे .

यावेळी नगरसेविका सुनिता भोसले, उपायुक्त श्रीकांत मायकलवार आरोग्याधिकारी डॉ जयंती आडके, नगर अभियंता लक्ष्मण चलवादी , विभागीय अधिकारी भालेराव , जनसंपर्क अधिकारी प्रविण दंतकाळे ,डॉ योगेश पुल्लेलु, एस एम आवटे , झड एम यादगीरी , इक्बाल तडकल, व्हनमाने संभाजी , विशाल सुरवसे, अजित कुलकर्णी ,पत्रकारबंधु, आदीसह नागरीक व भाविक उपस्थित होते.मा.संपादक,

दैनिक,---------------

उपरोक्त बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करणेस विंनती आहे.

जनसंपर्क अधिकारी